संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नीत

Buldana Urban Charitable Society's (R.No.3171/94)

# श्रीमती बसंतीबाई देवकिसनजी चांडक सहकार कला व वाणिज्य महाविद्यालय, डोंगरखंडाळा जि.बुलडाणा

सांकेताक क्रं. १००३

E-mail Id :shdccollogedongarkhandala@gamil.com




# PROSPECTUS

2024-25

।। श्रध्दास्थान ।।



# श्रीमती बसंतीबाई देवकिसनजी चांडक

# ※ मनोगत ※



**श्री.राधेश्याम चांडक (भाईजी)**
(अध्यक्ष,बुलडाणा अर्बन)

आपला भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे सुमारे ७२% लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते आणि ग्रामीण भागातील शाळामध्ये अद्यावत शैक्षणिक साधने, पुस्तके, संगनक आणि इंटरनेटची सुविधा, उपलब्धता मर्यादित असते त्यामुळे विद्यार्थ्यांना उच्चदर्जाच्या शिक्षणापासुन वंचीत रहावे लागते. याच कृषी प्रधान देशाचा कणा असलेल्या शेतकरी वर्गाच्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा मुलांना शिक्षणाचे दालने उपलब्ध व्हावीत व त्यांना अधिकाअधिक चांगले शिक्षण मिळावे अशी दुरदृष्टी मनात ठेवून २०20 साली डोंगरखंडाळा जि.बुलडाणा येथे कला व वाणिज्य महाविद्यालयची स्थापना केली. या संधीचा विद्यार्थ्यांनी पुरेपुर उपयोग करून घ्यावा, ही माझी इच्छा आहे.

खरे तर ग्रामीण भागातील हुशार, बुध्दीमान मुले असतात पण केवळ त्यांना योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे स्पर्धेच्या युगात मुले /मुली मागे पडतात. त्यामुळे त्यांच्या मध्ये मोठा न्युनगंड निर्माण होतो. या सगळ्या उदासिनतेमधुन त्यांना बाहेर काढण्यासाठी या महाविद्यालयाची सुरूवात केली आहे. येथे आपला पदवीच्या अभ्यासक्रमासोबत प्रशासकीय अभ्यासक्रमावर सुध्दा लक्ष केंद्रित केले आहे. त्यादृष्टीने येथे अद्यायावत कॉम्प्युटर लॅब सुरू करण्यात आली आहे.

तेथे अभ्यास क्रमाच्या पुस्तकासोबतच इतर स्पर्धा परिक्षाचे मार्गदशनपर पुस्तके उपलब्ध आहे. तसेच त्याच्यासाठी स्वतंत्र अभ्यासिकेची व्यवस्था आहे. जेणे करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्रशासकीय सेवेत यश प्राप्त करावे हीच अपेक्षा तसेच सर्व विद्यार्थ्यांचा शारीरीक, मानसीक आणि बौध्दीक विकास व्हावा व ते या देशाचे सुज्ञ व जबाबदार नागरीक म्हणून नावारूपास यावे या साठी मनःपूर्वक शुभेच्छा !

ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं
।। जय हिंद जय सहकार ।।

## ⁕ मनोगत ⁕



**सौ.कोमलताई झंवर**

(अध्यक्षा, बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटी)

शिक्षण हा मानवी जीवनविकासाचा मुख्य स्त्रोत आहे. शिक्षणामुळे जीवणाला उत्तम दिशा मिळते, परंतु, आपला भारत अजुनही विकसनशील देश आहे. आणि त्यात प्रतिगामी विचारसरनी, ह्यामुळे ग्रामीण भागातील लोक मुलींच्या शिक्षणासाठी अनुत्सायी असतात. कारण मुलींना बाहेरगावी शिक्षणासाठी ठेवणे त्यांना आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसते आणि खेडे विभागातून जवळपासच्या शहरात मुलींना शिक्षणासाठी रोज पाठविणे त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने पालकांना योग्य वाटत नाही म्हणून, त्यांचे पदविचे शिक्षण थांबते.

मी एक स्त्री असल्यामुळे त्यांच्या या अडचनी समजु शकते म्हणुनच वरिल बाबींचा विचार करून मुख्यत्वाने मुलींना नजरेसमोर ठेऊन डोंगर खंडाळा या गावी बसंतीबाई देवकिसनजी चांडक आर्ट आणि कॉमर्स महाविद्यालयाची जी सुरूवात केली आहे त्यांच्या विकासाकडे आम्ही लक्ष केंद्रित करित आहोत. आपल्याला देशाची प्रगती आणि विकास पहावयचा असेल तर ग्रामीण भागातील मुला-मुलींनच्या शिक्षणाकडे प्रामुख्याने लक्ष द्यावे लागेल.

*" अंधाराकडुन प्रकाशाकडे वाटचाल म्हणजेच शिक्षण"*

2 :



# प्राचार्यांच्या लेखणीतुन......

आधुनिक युगातील क्रांतीकारक व नेत्रदिपक प्रगतीकरिता निश्चितच शैक्षणिक संस्थांचे योगदान महत्वपूर्ण दिसून येते. स्वतंत्र भारताच्या विकासामध्ये आपला सुध्दा खारीचा वाटा असावा या दृष्टिकोनातून बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटी द्वारा संचालित महविद्यालयाची स्थापना सन २०२० मध्ये करण्यात आली. तसेच उच्च शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे. या करिता 'विद्या विनयेन शोभते' या भावनेतून विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांचा विकास म्हणजेच आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, कल्पकता, सृजनात्मकता, आदर्शवाद, देशभक्ती, देशप्रेम, सद्गुण, सदाचार, शिलाचार व सुसंस्कारीत उच्चशिक्षित पिढी निर्माण व्हावी याकरिता महाविद्यालय सदैव प्रयत्नशील आहे.

विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक, मानसिक, नैतिक, सामाजिक व सुसंस्कारीत गुण रूजवण्याचे कार्य आमच्या महाविद्यालयाच्या माध्यमातुन होत आहे याचा मला अत्यंत आनंद आहे. उच्च विद्याविभुषीत प्राध्यापक वर्गाच्या माध्यमातून सोबतच योग्य शैक्षणिक वातावरण, सहकार्य आणि मार्गदर्शनातून विद्यार्थ्याला भविष्यातील संकटांना सामोरे जाण्याचे बळ देण्याचे कार्य हाती घेऊन त्यांच्या भविष्याला निश्चित आकार देण्याचे कार्य व जिवनाला योग्य दिशा दाखवण्याचे कार्य आम्ही करीत आहोत.

आज ज्यांच्या प्रेरणेतुन कल्पकतेतून व भविष्यातील दुरदृष्टीकोनातून या महाविद्यालयाची स्थापना झाली.श्रेय नवप्रवर्तक सहकारातील पांडुरंग उपसे ज्यांना संबोधल्या जाते ते सहकार महर्षी आदरणीय श्री.राधेश्याम चांडक एक बहुआयामी व्यक्तीमत्व कर्मवीर, कुशल व्यवस्थापक, योग्य मार्गदर्शक ज्यांनी शिक्षणाची पाळ मुळं भगीरथ प्रयत्नांनी खोलपर्यंत रूजविली व येथील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जी स्वप्नं बघितलीत आणि आम्हाला जी दिशा दाखवली तीच दिशा तेच स्वप्न घेऊन आम्ही आपल्या सर्वांच्या सहकार्याने त्यांच्या स्वप्नांना नवीन बळ देऊन प्रत्यक्षात उतरवण्याचा एक छोटासा प्रयत्न करीत आहोत.

*"Bhaiji's Vision is our Mission"*

प्राचार्य

डॉ.जे.एस.वाघमारे

३

# * संचालक मंडळ *

| क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| ०१ | मा.सौ.कोमल सुकेश झंवर | अध्यक्षा |
| ०२ | मा.श्री.डॉ.किशोर किसनलालजी केला | उपाध्यक्ष |
| ०३ | मा.श्री.राधेश्याम देवकिसनजी चांडक | सचिव |
| ०४ | मा.श्री.जयसिंह भावतसिंह जयवार | सहसचिव |
| ०५ | मा.श्री.दिनेश अंबालालजी गांधी | कोषाध्यक्ष |
| ०६ | मा.श्री.डॉ.सुकेश ब्रिजमोहनजी झंवर | सदस्य |
| ०७ | मा.श्री.मनिष दुर्गाप्रसाद कासट | सदस्य |
| ०८ | मा.श्री.राजेंद्र बालकीसनजी झवंर | सदस्य |
| ०९ | मा.सौ.किर्ती मनिष कासट | सदस्या |
| १० | मा.सौ.पल्लवी विशाल तोतला | सदस्या |
| ११ | कु.कनिष्का सुकेश झंवर | सदस्या |

4.

# * महाविद्यालयीन विकास समिती *

| क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| ०१ | मा.श्री.राधेश्याम देवकिसनजी चांडक | अध्यक्ष |
| ०२ | प्रा.डॉ.जे.एस.वाघमारे (M.A.M.Sc.Ph.D.) | सचिव |
| ०३ | डॉ.कावेरी संदिप सावळे (वैद्यकीय अधिकारी) | सदस्या |
| ०४ | श्री.जगदिशचंद्र शरदचंद्र पाटील | सदस्य |
| ०५ | श्री.शैलेशकुमार बळीराम काकडे | सदस्य |
| ०६ | प्रा.सतिश पंडितराव रोठे (M.Sc.) | शिक्षक प्रतिनिधी |
| ०७ | प्रा.राजेंद्र शिवाजी घोराडे (SET) | शिक्षक प्रतिनिधी |
| ०८ | प्रा.वसंत भास्कर वानखडे (SET) | शिक्षक प्रतिनिधी |
| ०९ | श्री.सचिन प्रकाश खरात | शिक्षकेत्तर कर्मचारी |

5



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

# * विद्यापीठ गीत *

-प्राचार्य डॉ. विठ्ठल वाघ

विद्या चिंतन । विद्या मंथन ।
विद्या सर्जन । विद्या जीवन ।।

जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले ।
संत गाडगे बाबा तुमचे स्वप्न पूर्ण झाले ।।

कुणी न आता खुळे अडाणी, ज्ञानासह विज्ञान कळाले
पर्णकुटीतील प्रतिभेलाही, आभाळाचे पंख मिळाले
दशसूत्राचे अक्षर अक्षर वेद नवा बाले ।। १ ।।
जनमन...

किती रंजले, किती गांजले, किती आंधळे लुळे पांगळे
कर्मयोग निष्काम आचरुन, कवेत घेता बांधव सगळे
भूतदयेच्या ओलाव्याने मानस मोहरले ।।२।।
जनमन...

धर्मजातीच्या पलिकडेही माणूस केवळ माणूस असतो
भेदभ्रमांचे बंध तोडूनी मानवतेचे पूजन करतो
पिढ्यापिढ्यांचे जीवन दर्शन विश्वात्मक झाले ।।३।।
जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले ।
संत गाडगे बाबा तुमचे स्वप्न पूर्ण झाले ।।

Teaching staff list

## ब्रिद वाक्य (Motto)

ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं

## दृष्टिकोन (VISION)

उत्कृष्ठ शिक्षणातून शारीरीक, मानसिक, नैतिक दृष्ट्या सक्षम विद्यार्थी निर्माण करणे ज्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होऊन, एक अभ्यासू जबाबदार नागरीक देशाच्या सेवेकरिता निर्माण होतील.

## ध्येय (MISSION)

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आयुष्यास योग्य दिशा देऊन देशासाठी सक्षम नागरीक घडवणे आणि सांस्कृतीक वारसा जतन करणे.

## महाविद्यालयाची उद्दिष्ट्ये (Our Goals)

०१) पारंपारिक आणि नाविण्यपूर्ण शिक्षणपध्दतींद्वारे दर्जेदार शिक्षण देणे.

०२) व्यावसायिक कौशल्य आणि व्यक्तिमत्वविकासासाठी गतिशिल शैक्षणिक वातावरण निर्माण करणे.

०३) संस्थेच्या गौरवशाली वारसा लक्षात घेवून चांगले नैतिक मूल्ये आणि राष्ट्रवादाची भावना समाविष्ट करणे.

०४) आधुनिक व तांत्रिक ज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे.

०५) विविध शैक्षणिक संस्थांमध्ये अधिक सुसंवाद आणि समन्वयाला प्रोत्साहन देणे अशा प्रकारचे कौशल्य विद्यार्थी / विद्यार्थीनीमध्ये निर्माण करणे.

०६) शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात विद्यार्थ्यांचे योगदान निर्माण करणे.

०७) प्रशासकीय सेवेत जास्तीत जास्त विद्यार्थी लागतील या दृष्टीने संपूर्ण प्रयत्न.

# प्रवेश पात्रता

*** प्रथम वर्ष वाणिज्य -**

१२ वी (एच.एस.सी.) कला, वाणिज्य, विज्ञान, एम.सी.व्ही.सी. उत्तीर्ण विद्यार्थी

*** द्वितीय वर्ष वाणिज्य -**

अमरावती विद्यापीठाची प्रथम वर्ष वाणिज्य अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी.

*** तृतीय वर्ष वाणिज्य -**

अमरावती विद्यापीठाची द्वितीय वर्ष वाणिज्य अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी.

*** प्रथम वर्ष कला -**

१२ वी (एच.एस.सी.) कला, वाणिज्य,विज्ञान परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी

*** द्वितीय वर्ष कला -**

अमरावती विद्यापीठाची प्रथम वर्ष कला अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी

*** तृतीय वर्ष कला -**

अमरावती विद्यापीठाची द्वितीय वर्ष कला अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी

४

# Scholarship Scheme Benefit for Students

| Category | Criteria | Scheme |
|---|---|---|
| Open | Annual Income of the family must be up to 8 Lakh.<br>ज्यांचे वार्षीक उत्पन्न आठ लाख पर्यंत आहे. | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti |
| Minority | Annual Income of the family must be up to 8 Lakh.<br>ज्यांचे वार्षीक उत्पन्न आठ लाख पर्यंत आहे. | Sate Minority Scholarship Part II (DHE) |
| S.C. | Candidate family income should be less than or equal to 2,50,000/-<br>ज्यांचे वार्षीक उत्पन्न दोन लाख पन्नास हजार किंवा त्यापेक्षा कमी आहे. | Government of India Post-Matric Scholarship |
| S.C.(Freeship) | Candidate family annual income above Rs 2,50,000/- without any upper limit<br>ज्यांचे वार्षीक उत्पन्न दोन लाख पंन्नास हजार किंवा त्यापेक्षा कमी आहे. | Post-Matric Tuition Fee and Examination Fee (Freeship) |
| S.T. | Family annual Income <=2,50,000/-<br>ज्यांचे वार्षीक उत्पन्न दोन लाख पंन्नास हजार किंवा त्यापेक्षा कमी आहे. | Post Matric Scholarship Scheme (Government Of India) |
| S.T.(Freeship) | Family annual Income <=2,50,000/-<br>ज्यांचे वार्षीक उत्पन्न दोन लाख पंन्नास हजार किंवा त्यापेक्षा जास्त आहे. | Tution Fee & Exam Fee for Tribal Students (Freeship) |
| OBC | Candidate family annual income should be less than or equal to Rs. 1.00 Lakh.<br>ज्यांचे वार्षीक उत्पन्न एक लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे. | Post Matric Scholarship to OBC Students |
| SBC | | Post Matric Scholarship to SBC Students |
| VJNT | | Post Matric Scholarship to VJNT Students |
| OBC(Freeship) | Candidate family annual income is more than 1.00 Lakh and less than or equal to 8.00 Lakh.<br>ज्यांचे वार्षीक उत्पन्न एक लाख पेक्षा जास्त आणि आठ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे. | Tuition Fees and Examination Fees to OBC Students |
| SBC(Freeship) | | Tuition Fees and Examination Fees to SBC Students |
| VJNT(Freeship) | | Tuition Fees and Examination Fees to VJNT Students |

**शिष्यवृत्तीसाठी अर्जाकरिता आवश्यक कागदपत्रे : (प्रत्येकी एक सत्यप्रत)**
०१) दहावीची मार्कशीट ०२) बारावीची मार्कशीट ०३) शाळा सोडल्याचा दाखला (T.C.) ०४) आधारकार्ड ०५) जातीचा प्रमाणपत्र ०६) उत्पन्नाचा दाखला ०७) अधिवास ०८) प्रवेश फी पावती ०९) बँक पासबुक १०) वडिलांचे मृत्यूचे प्रमाणपत्र (आवश्यक असल्यास) ११) Gap Certificate (आवश्यक असल्यास) १२) राशन कार्ड १३) पालकाचे प्रतिज्ञापत्र १४) मागील वर्षाच्या सर्व सत्राच्या गुणपत्रिकांच्या सत्यप्रती (द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकरिता)

9

# वार्षिक प्रवेश शुल्क (विना अनुदानित विभाग)

| अ.क्र. | अभ्यासक्रम | शुल्क(वार्षिक) |
|---|---|---|
| ०१ | बी.ए.भाग १ | ४४९४/- |
| ०२ | बी.ए.भाग २ | ४५३८/- |
| ०३ | बी.ए.भाग ३ | ४३६२/- |
| ०४ | बी.कॉम भाग १ | ६३६४/- |
| ०५ | बी.कॉम भाग २ | ६४०८/- |
| ०६ | बी.कॉम भाग ३ | ६३३२/- |

## नियम

०१) महाविद्यालय नियमांचे, शिस्तीचे पालन करणे प्रत्येक विद्यार्थ्यास बंधनकारक असेल.

०२) महाविद्यालयाच्या आवारामध्ये धुम्रपान, तंबाखु सेवन, अल्कोहोल युक्त पेय अशा प्रकारच्या अंमली पदार्थांचे सेवन केल्यास रू.२००/- दंडात्मक कार्यवाही केल्या जाईल तसेच कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

०३) वर्ग सुरू असतांना बाहेर जाण्यास कोणासही परवानगी नाही.

०४) महाविद्यालयाच्या कामकाजात अडचणी येतील अशा प्रकारच्या मोबाईल वापरावर बंदी असेल.

०५) सुचना फलकावर वेळोवेळी लावण्यात येणाऱ्या सुचनाकडे लक्ष ठेवुन त्याचे योग्य रितीने पालन करावे.

०६) विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांशी सभ्यतेने वागावे. विद्यार्थ्यांचे गैरवर्तन, बेशिस्तपणा कडक शिक्षेस पात्र ठरेल. असभ्य गैरवर्तणूकीबद्दल विद्यार्थ्यांला महाविद्यालयातून काढून टाकले जाण्याचा संभव आहे.

०७) प्राचार्यांच्या परवानगी शिवाय महाविद्यालयाचे आवारात कोणत्याही प्रकारचे कार्यक्रम, सभा घेता कामा नये अगर सूचना पत्र लावू नयेत.

०८) महाविद्यालयात महाविद्यालयीन गणवेशातच उपस्थित रहावे.

०९) प्रत्येक प्रवेशित विद्यार्थ्याने ओळखपत्र स्वतःजवळ सदैव बाळगावे.

१०) माहीतीपत्रकात ज्या बाबींची नोंद केलेली नाही अशा सर्व बाबीसंबंधी अंतिम निर्णय प्राचार्यांचा राहील.

टिप - संत गाडगे बाबा अमरावतील विद्यापीठ परिपत्रकाप्रमाणे महाविद्यालयास सार्वजनिक सुट्टया देण्यात येतील तसेच स्थानिक सुटट्या देण्यात येतील तसेच स्थानिक सुटट्या प्राचार्याच्या आदेशाप्रमाणे जाहीर करण्यात येतील.

10.

# महाविद्यालयाविषयी....

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत संलग्नीत बुलडाणा अर्बन चॉरिटेबल सोसायटी द्वारा संचालित कला व वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना २०20 मध्ये झाली

आधुनिक भारताच्या शैक्षणिक विकासात खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयाचा सिंहाचा वाटा आहे. आधुनिक युगात होणाऱ्या जागतिक प्रगतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षण घेण्याची मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात उच्च शिक्षणाच्या सोयी सुविधा शासन पुरवू शकत नाही. म्हणून मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक खाजगी महाविद्यालये स्थापन झाली आहेत. याच दृष्टिकोनातून बुलडाणा तालुका व परिसरातील विद्यार्थ्यां करिता उच्च शिक्षणाची व्यवस्था इंग्रजी माध्यमातुन करून देण्याचा मानस महाविद्यालयाचा दिसून येतो.

बुलडाणा येथील स्थानिक व आजुबाजुच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासा करिता व स्पर्धेत टिकण्याकरिता गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाची व्यवस्था महाविद्यालयाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न सदैव करीत आहोत. महाविद्यालयाची प्रशस्त इमारत आहे.आधुनिक पध्दतीचे ग्रंथालय विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकरिता आहे. वाचन कक्ष, बगीचा, सुंदर परिसर तसेच सेमीनार हॉल असून विविध प्रकारचे व्यक्तिमत्व विकास, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व इतर कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या माध्यमातून वेळोवेळी करण्यात येते. गेली ५ वर्षापासून महाविद्यालयाची उत्तरोत्तर प्रगती दिसून येत आहे. तसेच उत्कृष्ट निकालाची परंपरा दिसून येते. महाविद्यालयाच्या माध्यमातून बी.कॉम व बी.ए.कोर्स चालविली जात असून विद्यापीठस्तरीय विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यास महाविद्यालय कटीबध्द आहे.

आपल्या अविरत सेवेत.

# * महाविद्यालयीन उपक्रम *

१) विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढावा म्हणून व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा

२) काळाची गरज म्हणून स्पोकन इंग्लीश चे विशेष वर्ग

३) बॅकींग क्षेत्राची माहीती व्हावी म्हणून बँक भेटी

४) विविध औद्योगीक क्षेत्रांचा अभ्यास दौरा

५) शैक्षणीक सहलींचे आयोजन

६) विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी सांस्कृतीक कार्यक्रम तसेच स्नेह संमेलन

७) पोलीस भरती साठी मोफत प्रशिक्षण

८) अद्यायावत वाचनालयाची सुविधा

९) स्पर्धा परिक्षांसाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या मार्फत मार्गदशन

१०) महाविद्यालयीन युवा महोत्सवात सहभाग

११) वेगवेगळ्या विषयांवर विद्यार्थी शोध प्रंबध

१२) धान्याच्या वर्गीकरणाची माहीती व्हावी म्हणून पणन भेट

१३) व्यवसाय मार्गदर्शन शिबीर.


12

# * भौतिक सुविधा *

| क्र. | नांव |
|---|---|
| ०१ | मुख्याध्यापक कक्ष |
| ०२ | स्टाफ रूम |
| ०३ | ऑफिस |
| ०४ | कॅम्प्युटर लॅब |
| ०५ | लायब्ररी |
| ०६ | वाचन कक्ष |
| ०७ | कॉन्फरसं हॉल |
| ०८ | क्रीडांगण |
| ०९ | कॅटीन |
| १० | मुलींकरिता प्रसाधन गृह |
| ११ | मुलांकरिता प्रसाधन गृह |
| १२ | विद्यार्थीनी कक्ष |
| १३ | क्लास रूम (६) |
| १४ | सांस्कृतिक सभागृह |
| १५ | पार्कींग व्यवस्था |
| १६ | सीसीटी सुविधा |
| १७ | लॅगवेज लॅब / भाषा कक्ष |
| १८ | स्पोर्ट साहित्य रूम |
| १९ | संगीत रूम |
| २० | ओपन जिम |
| २१ | कॉलेज गेट |
| २२ | इंनव्हरटर सुविधा |
| २३ | आर.ओ. पाण्याची व्यवस्था |
| २४ | अग्नीशामक |
| २५ | लाऊडस्पीकर सुविधा |

13




SAHAKAR ARTS AND COMMERCE
COLLEGE DONGAR KHANDALA
CAREER COUNSELLING


AHAKAR ARTS AND COM
COLLEGE DONGAR KHANI
CAREER COUNSEL
WORKSHOP





GPS Map Cam
Dongar Khandala, Maharashtra, India













संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नीत

Buldana Urban Charitable Society's (R.No.3171/94)

# श्रीमती बसंतीबाई देवकिसनजी चांडक सहकार कला व वाणिज्य महाविद्यालय, डोंगरखंडाळा जि.बुलडाणा

सांकेताक क्रं. १००३

E-mail Id :shdccollogedongarkhandala@gamil.com